# प्रेसनोट

## लग्नाचे अमिष दाखवुन सात महिलांची फसवणुक करणारा आरोपी अटक.

मानाजी नगर,न-हे,पुणे येथे राहणारे महिला फिर्यादी यांचे Shaadi.com या वेबसाईट वर अकाऊंट असल्याने त्यांना इसम नामे रविंद्र सुधाकर कुलकर्णी वय-४९ रा.सुवर्णरेषा अपार्टमेंट, दत्तवाडी,पुणे याने फोनकरुन त्यांचे Shaadi.com या वेबसाईटवर असलेल्या फिर्यादी यांचा फोटो पाहीला व तो त्यास आवडलेला असून त्याने तो सिंगापूर येथील C.T.C.I. या कंपनीमध्ये असोसिएट व्हाईस प्रेसिडेंट असल्याची बतावणी करुन फिर्यादी यांचेशी संपर्क वाढविला. व फिर्यादी यांना लग्नाचे अमिष दाखवून लग्नानंतर सिंगापुर येथे राहावयास लागणार असल्याने फिर्यादी यांना पासपोर्ट, व्हिजा, करन्सी एक्सचेंज, सॉलव्हन्सी अशी विविध कारणे सांगून फिर्यादी यांचेकडुन वेळोवेळी एकुण १५,६९,४००/- रोख रुपये व २६,०००/- रु. किंमतीचे सोन्याचे मंगळसुत्र असे स्विकारुन फिर्यादी यांनी ते परत मागीतले असता फिर्यादी यांना रोख रक्कम व सोन्याचे मंगळसुत्र परत न करता फिर्यादी यांना फोनवरुन जीवे ठार मारण्याच्या धमक्या देवून फिर्यादी यांची फसवणुक केली आहे. सदरबाबत सिंहगड रोड पोलीस स्टेशन,पुणे शहर येथे गुन्हा रजि.नं. ३७६/१६ भा.द.वि.कलम ४०६,४२०,५०७ दिनांक-०५/१०/२०१६ अन्वये गुन्हा दाखल आहे.

दाखल गुन्ह्यातील आरोपी रविंद्र सुधाकर कुलकर्णी याचेबाबत सायबर क्राईम सेल कडील सहा. पो.निरी.विजयमाला पवार यांना मिळालेल्या माहितीवरुन आरोपी नामे रविंद्र सुधाकर कुलकर्णी वय-५० रा.बंगला नं.१८५,सायल तारा,डी.एस.के.विश्व,धायरी,पुणे यास आज रोजी ताब्यात घेवून १५.०० वा. सीआरपीसी ४१(१) प्रमाणे अटक करुन सिंहगडरोड पोलीस स्टेशन कडे वर्ग करण्यात आले आहे.

आरोपी रविंद्र कुलकर्णी हा मागील दोन महिन्यापासून डी.एस.के.विश्व या उच्चभ्रु सोसायटी मध्ये राहावयास होता तसेच नमुद आरोपी हा महिलांची फसवणुक करुन त्यांचेकडुन विविध बँकेच्या वेगवेगळ्या अकाऊंटवर रक्कम ट्रान्सफर करुन घेत होता.

आरोपी बाबत सखोल माहिती घेता त्याचेविरुद्ध १) डेक्कन पो.ठाणे,पुणे शहर गु.र.नं.०५/२०१४ भादवि कलम ४०६,४२०, २) विश्रामबाग पो.ठाणे,पुणे शहर गु.र.नं.१६/२०१४ भादवि कलम ३५४,४२०, ३) येरवडा पो.ठाणे,पुणे शहर गु.र.नं.२८/२०१४ भादवि कलम ४२०,३४४,५०६(२),५०७ ४)सिंहगडरोड पो.ठाणे, पुणे शहर गु.र.नं.३७६/२०१६ भादवि कलम ४२०,४०६,५०७ ५)हिंजवडी पो.ठाणे,पुणे शहर गु.र.नं. ४७१/२०१६ भादवि कलम ३७६,४२०,४०६ ६)गंगापुर पो.ठाणे,नाशीक शहर गु.र.नं.१९०/२०१६ भादवि कलम ४२०,४६८,४७१,५०७,५०६,३४ ७)कोपरखैराणे पो.ठाणे,नवीमुंबई गु.र.नं.३३०/२०१६ भादवि कलम ४२०, असे एकुण ७ गुन्हे दाखल आहेत.

वरील कामगिरी पोलीस उपायुक्त आर्थीक व सायबर गुन्हे श्री.दिपक साकोरे यांचे मार्गदर्शना खाली सायबर क्राईम सेल कडील व.पो.नि.सुनिल पवार, स.पो.नि.विजयमाला पवार, सागर पानमंद, पो.उप.नि. नितीन खामगळ व पोलीस कर्मचारी अस्लम आत्तार, राजकुमार जाबा, संतोष जाधव, दिपक भोसले, अविनाश दरवडे, राहुल हंडाळ, आदेश चलवादी, शुभांगी मालुसरे यांनी केली आहे.